


# गाई-म्हशीमधील सड आणि कासेचे विकार







दुधाळ जनावरांमध्ये दुग्धोत्पादन कमी असण्यामागे बरीच करणे आहेत. त्यात प्रामुख्याने सड आणि कासेचे विकार हे आढळून येतात. दुधाळ जनावरास कासेचे व सडाचे आजार झाल्यास थेट दुग्धउत्पादनावर परिणाम होतो. जनावरांमध्ये कासेची नैसर्गिक ठेवणं हि तिला विकार होण्यास मुळतः कारणीभूत ठरतात. कासेचा संपर्क शेण, मूत्र, गोठ्यातील इतर घाण यांच्याशी येतो त्यामुळे स्तनदाह होऊ शकतो. कासेचे काही विकार जन्मतः असतात.

### कासेचे व सडाचे विकार

१. सड नसणे

२. सड छिद्ररहित असणे

३. सडांची संख्या जास्त असणे

४. दोन सड एकमेकास जोडलेली असणे

५. कास व सड यामध्ये पडदा असणे

६. सड धारेला जाड असणे / आकुंचित संकुचीत पेशी

७. सडातून दूध गळणे

८. सड फाटणे किंवा सडास छिद्र पडणे

९. सडातील नासरू

१०. सडात गाठी होणे

११. सड किंवा कासेचा गँगरीन/ सडणे



प्रकाशन

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

### १. सड नसणे :

काही जनावरांत जन्मतः कास असून सड नसतात. हा विकार फार क्वचित असतो. यावर कुठलाही उपचार लागू पडत नाही. अशाप्रकारची जनावरे पैदाशीसाठी वापरू नये.



### २. सड छिद्राविरहित असणे:

या विकारात सडाला छिद्र नसते. हा विकार जनावराला जन्मतः किंवा नंतर इजा पोहोचल्यामुळे होऊ शकतो. यामध्ये पशुवैद्यकाच्या साह्याने मोठ्या आकाराच्या सुईने सडाच्या टोकास छिद्र पाडून दूध काढावे. छिद्र बुजू नये म्हणून त्यात तीन दिवस टीट प्लग ठेवावे.

### ३. सडांची संख्या जास्त असणे:

सहसा गाई म्हशींमध्ये जन्मतः ४ सडाऐवजी ५ किंवा ६ सड आढळून येतात. काही वेळेस जनावर दुधात आल्यानंतर ह्या अतिरिक्त सडामुळे दूध काढण्यास अडथळा निर्माण होतो म्हणून लहान वयातच ती पशुवैद्यकाच्या सहाय्याने शल्य चिकित्सा करून काढून घ्यावी.

### ४. दोन सड एकमेकास जोडलेली असणे:

ह्या विकारात दोन सड एकमेकास एकाच त्वचेने किंवा स्नायूने जोडली गेलेली असतात. जर हि सड फक्त त्वचेने जोडली गेली असतील तर ती पशुवैद्यकाच्या साहाय्याने वेगळी करून घ्यावी.

### ५. दोन सड यामध्ये पडदा असणे:

हा विकार सुद्धा जन्मतः किंवा नंतर इजा पोहोचल्यामुळे होऊ शकतो. सडाच्या बुडाशी कास आणि सडात पडदा तयार होऊन कासेतील दूध सडात येत नाही. कास दुधाने भरलेली असते पण सड पिळल्यानंतर दूध निघत नाही. अशा विकारात हडसन टीट स्पायरल नावाचे साधन सडात गोलाकार हालचाली करून वर सारावे आणि पडद्यापर्यंत न्यावे. ह्याच्या गोलाकार गतीमुळे पडदा त्याच्या टोकास गुंडाळला जातो. त्यानंतर महत्वाची गोष्ट म्हणजे पडदा पुन्हा तयार होऊ नये म्हणून सड दर अर्ध्या तासाला पिळावे पण कास पूर्ण पिळून घेऊ नये, कासेत थोडे दूध ठेवावे.

### ६. सड धारेला जड असणे:

सडाच्या टोकास दूध काढण्या व्यतिरिक्त सडातून दूध गळू नये म्हणून संकुचीत पेशी (स्पिंक्टर) असतात. या संकुचित पेशी वरील ताण वाढल्यास किंवा आकुंचन पावल्यास सड धारेला जड जाते म्हणजे सडातून दूध लहान धारेत येते. त्यामुळे सडातील दूध काढण्यासाठी वेळ लागतो व सड  पिळण्यासाठी जोर लागतो. हा विकार म्हशींमध्ये प्रामुख्याने आढळतो.

बरेच जण दूध काढण्यासाठी हाताच्या अंगठ्याने सड दाबतात त्यामुळे सुद्धा या सकुंचित  पेशीला ताण पडून हा आजार होतो. अश्या म्हशीत पशुवैद्यकाकडून  शस्त्रक्रिया करून घ्यावी.



## ७. सडातून दूध गळणे:

या विकारात सडाच्या संकुचित पेशींचा ताण कमी किंवा सैल झाल्यामुळे सडातून दूध गळते. हा विकार सहसा जास्त दूध देणाऱ्या संकरित गाईत आढळतो. अश्या जनावराच्या शरीरात स्फुरद नावाच्या धातूचे प्रमाण कमी झाल्यामुळे सडाच्या संकुचित पेशींचा ताण कमी होतो व सडातून दूध गळते. अशा जनावरात स्फुरदाचे इंजेक्शन द्यावीत व त्यानंतर जनावरांच्या चाऱ्यात खनिज मिश्रण द्यावे जेणेकरून कमतरता होणार नाही.

## ८. सड फाटणे किंवा सडास छिद्र पडणे:

या विकारामध्ये सडाला जनावर चरताना काटेरी झुडपापासून, तार  कुंपणाची इजा होणे, धारदार व टोकदार वस्तुच्या इजेमुळे सडांवर खोलवर जखम होऊन सडाला इजा होते  किंवा सडाला छिद्र पडते. जनावर दुधात असेल तर त्यातून दूध गळते व वाया जाते. या शिवाय या मार्गातून जंतूंचा शिरकाव होऊन स्तनदाह होतो. जखम लहान असल्यास पोटॅशिअम परमॅंग्नेटच्या खड्याने छिद्रावर दाब द्यावा व जखमेची मलमपट्टी करावी. छिद्राचा आकार मोठा असल्यास त्यावर पशुवैद्यकाकडून शस्त्रक्रिया करून घेऊन छिद्र बंद करू घ्यावे.

## ९. सडातील नासरू (टीट फिश्चुला):

या विकारात सड फाटून किंवा छिद्र पडून, जर त्यावर ताबडतोब उपचार नाही केले तर नासरू तयार झाल्याचे आढळून येते. नासरू तयार झालेल्या मार्गातून दूध गळते व वाया जाते. नासरु झालेल्या जनावरांत पशुवैद्यकाकडून शस्त्रक्रिया करून घ्यावी. हि शस्त्रक्रिया शक्यतो जनावर आटल्यानंतर करावी म्हणजे जनावरांच्या सडावर मारलेले टाके हे दुधाच्या संपर्कात न येता लवकर जुळतात. या उलट जर जनावर दुधात असताना शस्त्रक्रिया केली असता हे टाके दुधाच्या संपर्कात येऊन तुटतात किंवा टाक्यामुळे सड पिळता येत नाही. त्यासाठी टीट प्लग वापरून दूध काढता येईल व त्यातून प्रतिजैविके सडात सोडता येतात, परंतु नासरु झालेल्या जनावरात भाकड काळात शस्त्रक्रिया करणे हितकारक ठरते.

## १०. सडात गाठी होणे:

जनावरात स्तनदाह झाल्यामुळे किंवा सड पिळताना अंगठ्याचा दाब पडल्यामुळे सडात गाठी होतात. सडात लहान व एका जागी गाठ होते किंवा पूर्ण सडात गाठी होतात. जर लहान व एकाच ठिकाणी गाठ असेल आणि दुधाच्या मार्गात अडथळा करत असेल तर शस्त्रक्रिया करून काढावी. पूर्ण सडात गाठी होऊन गच्च असेल तर त्यावर कुठलाही इलाज



उपयोगी पडत नाही व सड मूक/निकामी होते. अश्या प्रकारे स्तनदाह होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना काळजीने अंगीकारावी किंवा स्तनदाह झाल्यानंतर त्यावर ताबडतोब इलाज करून घ्यावा म्हणजे सडात गाठ होणार नाही.

## ११. सड किंवा कासेचा गँगरीन:

स्तनदाह किंवा जंतू संसर्गामुळे जनावरात सड किंवा कास सडते म्हणजे गँगरीन होतो. जंतूंच्या संसर्गातून सड सडते किंवा कास सडते. सुरुवातीला सड व कास लालसर होते, गरम लागते व कालांतराने निळसर पडते. सडलेला/ गँगरीन झालेला भाग हा निरोगी भागापासून वेगळा होतो व त्यात एक रेष तयार होते. कालांतराने सडलेल्या भागाची संवेदना नाहीशी होते. त्या भागातून दुर्गंधीयुक्त स्त्राव येतो व शेवटी सडलेला भाग गळून पडतो. काही वेळा त्या ठिकाणी रक्तस्त्राव होतो व नंतर हि जखम खूप दिवसांनी भरून येते. परंतु या जंतूंपासून विष रक्तात सोडल्यामुळे जनावरांच्या जीवितास धोका होऊन जनावर दगावू शकते. तेव्हा अशी गँग्रीनची लक्षणे दिसताच तात्काळ पशुवैद्यकाकडून उपचार करून घ्यावा. औषधोपचाराने बरे न झाल्यास शस्त्रक्रीया करून सडणारे सड किंवा कास काढून टाकावे.

या व्यतिरिक्त काही जनावरांत कासेला आवाळू होणे, कासेवर मस येणे, कासेचा कर्करोग होणे असे विकार आढळतात. अशाप्रकारे सड व कासेचे विकार झाल्यास पशुपालकाने पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.


www.mafsu.in www.knpcvs.in

✲ मार्गदर्शक ✲

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ लेखक ✲

**डॉ. व्ही. डी. आहेर**
प्राध्यापक, पशुशल्यचिकित्साशास्त्र विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.